# भारतातील १० रहस्यमय गोष्टी

## 1) रुपकुंड



रुपकुंड हा उत्तर भारतातील उत्तराखंड व नेपाळचा सीमेवरील त्रिशुल पर्वतरांगात असलेला एक नैसर्गिक तलाव आहे. जवळपास 16 हजार फुटांचा उंचीवर असलेल्या या तलावाचा परीसर कडाक्याचा थंडीमुळे आणि बर्फाळ वादळांमुळे राहण्यायोग्य नाही. तलावाला चोहीबाजुंनी बर्फाळ पर्वतांनी वेढलेले आहे. रुपकुंड तलाव अनेक वर्षांपासुन एक रहस्याचा विषय बनुन आहे कारण 1942 मध्ये एका गिर्यारोहकाचा पथकाला त्या तलावाचा किनार्यावर शेकडो मानवी सांगाड्यांचा खच सापडला होता. म्हणुनच ह्या तलावाला 'सांगाड्याचा तलाव' असेही म्हणतात. ह्या तलावाची खोली अंदाजे 2 मीटर आहे. उन्हाळ्यात जेव्हा तलावातील बर्फ वितळतो तेव्हा त्याचा तळाशी आणखी शेकडो सांगाडे दिसतात.

कार्बन डेटींगच्या प्रकियेने त्या सांगाड्याचे वय माहित करण्यात आल्यावर ते 1200 वर्ष जुने असल्याचे आढळले आहे. जवळपास 300 मानवांचा सांगाड्यांचा शास्रज्ञांनी अभ्यास केला आहे. बर्फाळ वातावरण असल्यामुळे अजुनही हाडांवरील मांस, केसं, नखे आणि अंगावरील कपड्यांचे तुकडे बर्यापैकी संरंक्षित राहिले आहेत. याबद्दल अनेक तर्कवितर्क लढविण्यात आले आहेत पण हे सांगाडे कोणाचे आहेत याबद्द्ल अजुनही खात्रीने सांगण्यात येत नाही.

## 2) पद्मनाभस्वामी मंदिराचे शेवटचे दार:

संपुर्ण जगात सर्वात श्रीमंत मंदिर म्हणुन प्रसिद्धी पावलेले पद्मनाभस्वामी मंदिर, केरळची राजधानी थिरुवनंतपुरमचा केंद्रस्थानी वसलेले आहे. या मंदिरात सहा दरवाजे आहेत. ज्यांच्यात एकापेक्षा अधिक चेंबर आहेत. बाहेरील चेंबर हे भुतकाळात अनेकवेळा उघडण्यात आले होते पण आतील अनेक चेंबर मात्र मागील हजारो वर्षांपासुन उघडण्यात आले नव्हते. पहिल्या पाच दरवाज्यांचा आतील चेंबरना केरळ उच्चन्यायालयाचा आदेशानुसार उघडण्यात आले, ज्यांच्यात करोडो रुपये किमतीचा खजिना होता. खजिन्यात सोन्या-चांदीचे दागदागिने, सोन्याचा मुर्त्या, सोन्याची नाणी, उच्च दर्जाचे हिरे ई. चा समावेश होता. राहिलेल्या शेवटच्या दाराचीही उघडण्याची मागणी होत असुन मंदिरातील पुजार्यांचा मात्र यास विरोध आहे, त्यांच्या म्हणण्यानुसार, त्या दरवाज्यावर दोन सर्पाकृती आहेत, ज्या दुसर्या कोणत्याही दरवाज्यावर नाही. ह्या सर्पाकृती म्हणजे धोक्याचे प्रतिक आहे. काहींच्या म्हणण्यानुसार, ह्या दरवाजाच्या पलीकडे भगवान विष्णुचे वास्तव्य आहे म्हणुन हे दार उघडल्यास भगवान विष्णुचा कोप होईल आणि सर्व सृष्टीचा विनाश होईल. तसे पाहिल्यास शेवटचे दार इतर दारांपेक्षा वेगळे आहे, ते पुर्णत: लोखंडाचे असुन विना कडीकोंडाचे आहे. पुजार्यांनुसार त्यास उघडण्यासाठी एक 'गुरू मंत्र' उच्चारावा लागतो जो कोणालाही माहीत नाही. दरवाज्याचा पलीकडे काय असावे याबद्दल अनेक तर्कवितर्क लावले जातात, कोणी म्हणतो आणखी खजिना असेल, कोणी म्हणतो देवालोकांचे दर्शन होईल, कोणी म्हणतो विनाश होईल तर कोणी म्हणतो दुसर्या जगात जाण्याचा मार्ग उघडेल (एलियंसच्या)....आता त्या दरवाज्यामागे काय आहे देवजाणे!




# 3) जुळयांचे गाव



कोडीन्ही, मल्लपुरम जिल्हा, केरळ. या गावात जवळपास 2000 कुटूंब राहतात. आपल्यातील कदाचित एखाद्यालाच या गावाचे नाव माहित असावे, पण हेच गाव आता जगाचा आश्चर्याचे विषय बनले आहे.
काय रहस्य आहे या गावात???
या गावातील 2000 कुटूंबात जवळपास 350 जुळे आहेत! म्हणजे जगात 1000 जिवंत जन्मदरामागे 6 जुळे जन्माला यायचा आलेख असताना या गावात मात्र तो दर 1000 जिवंत जन्मदरामागे 42 जुळे असा आहे! जर तुम्हाला जुळे पाहायचे असतील तर गावात कोठेही जा, प्रत्येक कुटूंबात, लहान, मोठे, मध्यमवयीन, शाळांमध्ये, बाजारात, दुकानावर, ऑफिसांत सर्वत्र तुम्हाला जुळे दिसतील. पण ह्या गावात एवढे जुळे जन्मालाच कशे येतात? डॉक्टरांकडेही ह्या प्रश्नाचे उत्तर नाहीये. काही डॉक्टरांचा म्हणण्यानुसार, कदाचित पाण्यातील एखाद्या रसायनचा हा प्रभाव असु शकतो.

# 4) सिंधु संस्कृती आणि अणुबॉम्ब




तुम्हाला हडप्पा व मोहेंजोदाडो येथील संस्कृतीबद्दल तर माहीत असेनच. त्या काळातील त्यांचे शहर व्यवस्थापनाचे नियोजन खरोखर वाखाणण्याजोगे आहे. तेथील घरांचे बांधकाम, तेथील रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था ई. पण संपुर्ण शहरंचा शहरं एका रात्रीत नष्ट कशी झाली?
जेव्हा हडप्पा व मोहेंजोदाडो येथील उत्खनन तेथील रस्त्यांचा पातळीपर्यंत पोहोचले, शास्रज्ञांना तेथे अनेक मानवी सांगाडे अस्त्याव्यस्त पसरलेले सापडले. अनेक सांगाड्यांनी एकमेकांची हात धरुन ठेवले होते, त्यांचे मृतदेह रस्त्यांवरच पडुन होते, ते त्यांचा घरांपर्यंतसुद्धा पोहोचु शकले नव्हते जणु एखाद्या अचानक आलेल्या मृत्युचा तांडवाचा तो परिणाम होता. सर्व मृतदेहांचे चेहरे खाली, वडील, आई व मुलांचे हात एकमेकांत गुंफलेले होते.
कोणती गोष्ट असा विनाश करु शकते?? का ते मृतदेह कुजले नाहीत किंवा प्राण्यांकडुन खाण्यात आले नाही. शिवाय त्या मृतदेहांवर कसलेही घातापाताचे निशाण आढळले नव्हते. शेवटी एक गोष्ट लक्ष द्यावीशी वाटते, ती म्हणजे त्या भागातील किरणोत्साराचे प्रमाण! तेथील किरणोत्साराचे प्रमाण हे जपानमधील हिरोशिमा व नागासाकी येथे अणुबॉम्ब टाकल्यानंतर निघालेल्या किरणोत्सारापेक्षा कितीतरी पटींनी जास्त आहे. याला आणखी दुजोरा देणारी गोष्ट म्हणजे सिंधु संस्कृतीतील घरांची वाळु मातीची भिंत आणि तेथील अनेक भांडीही अक्षरश: वितळुन गेलेली आहेत. खुप उष्ण प्रकियाच हे घडवु शकते. सिंधु संस्कृतीचा भागात कोठेही असा ज्वालामुखी उद्रेकाची झाला नसल्याचा पुरावा नाही. हे सर्व फक्त एका अणुबॉम्बचा विस्फोटामुळेच घडु शकते. Strange! त्या काळात अणुबॉम्ब? का त्याचे कारण दुसरेच काही होते? पण मग ते किरणोत्सार (रेडीओएक्टीव्हीटी)?


## 5) द्वारका



अनेक पुरातन शास्रांत व पुराणांत श्रीकृष्णाची नगरी द्वारकेचा उल्लेख आढळतो. 12000 वर्षांपुर्वी बनलेल्या द्वारकेचे 6 वेळा समुद्रात विलोपन झाले. म्हणजे, श्रीकृष्णाने सातवेळा ह्या शहराचे निर्माण केले होते. समुदाचा वाढत्या पातळीमुळे हे शहर सहावेळा बुडाले होते. डिसेंबर 2000 मध्ये भारतीय शास्रज्ञांना गुजरातमधील खंबतचा आखातात समुद्राचा तळाशी अनेक वर्तुळाकार, अर्धवर्तुळाकार, चौरसाकृती दगडं सापडले आहेत. अनेक दगडी भिंती, रस्ते, अनेक दगडी ऍंकर आणि जहाजी बंदरही आढळले आहे. कार्बन डेटींगनुसार त्याकाळात असलेल्या समुर्द्री वाहतुकीचा हा एक महत्त्वाचा पुरावा आहे. पुर्ण सत्य अजुन प्रकाशात यायचेय, पण निश्चितच हा आतापर्यंतचा एक सर्वात मोठा शोध ठरेल.


# 6) दिल्लीतील खुंखार माकड

मे 2001 च्या एका मध्यरात्री गाढ झोपेत असलेल्या दिल्लीतील रहिवाश्यांवर 4 फुट उंच, केसाळ शरीर, डोक्यावर हेलमेटसारखे आवरण, हातांत धातुंचे नखे, चकाकते लालजरक डोळे, छातीवर तीन बटणे व पिळदार शरीर असलेल्या एका अज्ञात मानवसदृश माकडाने हल्ला केला. त्यात अनेक लोकं जखमी झाले. दुसर्याच दिवशी संपुर्ण देशभरात ही बातमी वार्यासारखी पसरली.



अनेक प्रत्यक्षदर्शी आपापली कहाणी कॅमेर्यासमोर मांडु लागले, काही आपले जखम दाखवु लागले. हल्ल्यांचा प्रकार आणखी दोन-तीन महिने चालला. अख्ख्या जगात ह्या रहस्यमय प्राण्याचा बातमीने धुमाकुळ माजविला. माकडासारखे शरीर असलेला प्राणी दिल्लीत रात्री लोकांना झोपु देत नव्हता. तो गाढ झोपेत असलेल्या लोकांवर अचानक हल्ला करीत असे व तसाच काळोखात गायबही होत असे. त्याचा हल्ल्यात अनेक लोकं जखमी झाले होते आणि दोन जण मृत्युमुखी पडले होते. त्यात एक वृद्ध आणि गरोदर स्रीचा समावेश होता. दोघांचाही मृत्यु अचानक झालेल्या हल्ल्यामुळे घाबरुन पळण्याचा नादात घराचा छतावरुन पडुन मृत्यु झाला होता. लोकांचा व मिडीयाच्या वाढत्या दबावाची दखल घेत पोलिसांना ‘शुट एट साईट’ची ऑर्डर देण्यात आली होती. पण एकाएकी अचानक हल्ले थांबले आणि दिल्लीवाल्यांना सुटकेचा दिलासा मिळाला. तो प्रसंग आठविताना आजही तेथील प्रत्यक्षदर्शींचा अंगावर काटे येतात. कधीकाळी सबंध देशात खळबळ उडवणारा तो खुखांर अज्ञात प्राणी अजुनही सर्वांसाठी एक रहस्य बनुन आहे.

# 7) सम्राट अशोकचे अज्ञात नऊ माणसे




सम्राट अशोक जगातील महान राजांपैकी एक होता. इतिहासकारांसाठी समाट अशोक नेहमीच एक कुहूतुलाचा विषय राहिला आहे. प्राचीन उल्लेखांनुसार, सम्राट अशोकने एक गुप्त समाज उभा केला होता, ज्यात नऊ अज्ञात माणसांचा समावेश होता. हा गुप्त समाज सम्राट अशोकचा काळापासुन ते आजपर्यंत अस्तित्वात असल्याचे म्हटले जाते. 2000 वर्षांनंतरही हा समाज एक रहस्य आणि गुढतेचा विषय आहे. ती सर्व अज्ञात नऊ माणसं ही अतिशय हुशार व बुद्धीवान होती/आहेत. असे म्हटले जाते की, या गुप्त समाजाचे काम त्याकाळातील अतिशय गुप्त व संवेदनशील माहितीचे संरक्षण करणे आहे, ज्यात काही प्राचीन विनाशक शक्तींचाही समावेश होतो. ती माहिती जर चुकीचा हातात पडली तर संपुर्ण जगाचा विनाशास कारणीभुत ठरु शकते. सम्राट अशोकचे हे अज्ञात नऊ संपुर्ण जगात पसरलेले असुन ते वेळोवेळी जगाचे रक्षण करीत असल्याचे म्हटले जाते.

# 8) मिसिंग MH-370 चे रहस्य




8 मार्च 2014, मलेशिया एअरलाईंसचे बोईंग 777 विमान MH-370 हे क्वालांपपुर ईंटरनेशनल एअरपोर्ट वरुन बिजिंग ईंटरनेशनल एअरपोर्टकडे जात असताना त्यातील 239 व्यक्तींसह (12 विमान कर्मचारी व 227 प्रवाशी) बेपत्ता झाले. उड्डाण केल्याचा अर्ध्या तासातच विमानाचा एअरपोर्ट कम्युनिकेशनसोबत संपर्क तुटला. रडार यंत्रणाही विमानाचे तंतोतंत लोकेशन सांगु शकत नव्हती. एवढे मोठे विमान हरवले होते त्यातील 239 व्यक्तींसह हरविले होते. काही तासांतच ही बातमी जगभरातल्या न्युज चॅनल्सवर दिसायला लागली. प्रवाशांचे नातेवाईक त्यांना फोन लाऊन लाऊन थकले होते. एअरपोर्ट प्रशासन तहानभुख विसरुन सुत्र हलवत होते. गंभीर वातावरणात हाय कमांडच्या हालचाली सुरू झाल्या. कुठे क्रॅश झाले, अपहरण झाले किंवा काय?? कोणताच प्रसंग खात्रीने सांगता येत नव्हता. मलेशियाचा पंतप्रधानांनी विमान क्रॅश झाले असुन कोणाच्याही वाचण्याची शक्यता नाही सांगुन विषय संपविला. थोड्याच दिवसांत आतापर्यंतचे जगातील सर्वात मोठे व सर्वात खर्चिक सर्च ऑपरेशन सुरू झाले. 26 देशांनी त्या विमानाचा ऑस्ट्रेलिया ते कझाकिस्तानपर्यंत, जमिनीपासुन ते समुद्रापर्यंत शोध सुरू केला. सर्व शक्यता वारंवार पडताळुन पाहिल्या, पण विमानाचा काही थांगपत्ता लागला नाही. विमान कोसळल्याचा कुठेही एकसुद्धा पुरावा आजपर्यंत सापडला नाही, ना विमानाचा ब्लॅक बॉक्स, ना अवशेष... MH-370 च्या अश्या अचानक गायब झाल्यामुळे अनेक तर्कवितर्क लावण्यात येतात. समुद्रात क्रॅश (विमान सरळ समुद्रात घुसुन तळाचा फटीत खोलवर शिरले असावे), दहशतवाद्यांकडुन अपहरण, परग्रहींकडुन अपहरण तर काहींच्या मते, विमान एखाद्या अज्ञात बेटावर सुखरूप उतरले असावे. MH-370 मध्ये एकुण 227 प्रवाशी होते ज्यात 154 चीनी, 38 मलेशियन, 6 ऑस्ट्रेलियन, 5 भारतीय, 7 इंडोनेशियन, 3 अमेरिकन आणि 2 कॅनेडियन होते. बेपत्ता 5 भारतीयांचे नाव: चेतना कोलेकर(55); स्वानंद कोलेकर(23); विनोद कोलेकर(59); चन्द्रिका शर्मा(51) आणि क्रांती शिरसाठ(44).

# 9) प्राचीन परग्रही

रायपुर, छत्तीसगडपासुन 130 किमी अंतरावर असलेल्या एका गुहेत भारतीय पुरातत्वतज्ञांना रहस्यमय प्राचीन चित्रे आढळली आहेत. पुरातत्वतज्ञांनुसार, गुहेतील चित्रे ही जवळपास 10,000 वर्षे जुनी असुन त्यांत परग्रही व त्यांच्या उडत्या तबकड्यांचा समावेश आहे. त्यांचा अभ्यासात समोर आलेल्या माहितीनुसार, तेथील प्राचीन लोकांनी कदाचित त्याकाळी



परग्रहींना पाहिले असावे वा त्यांची कल्पना केली असावी. गुहेतील सर्व चित्रे ही नैसर्गिक रंगांनी काढलेली आहेत आणि एवढ्या वर्षांनीसुद्धा पुसल्या गेल्या नाहीत. त्या चित्रांत विचित्र आकृत्या, अंतराळवीराप्रमाणे स्पेस सुट घातलेल्या मानवाकृती आकृत्या, उडत्या तबकड्या ई. दाखविण्यात आल्या आहेत. गावांतील लोकं त्यांच्या पुर्वजांकडुन 'रोहेला समाज'बद्दल ऐकत आलेल्या गोष्टी आजही सांगतात की, ते(रोहेला लोकं) कमी उंचीचे होते. ते आकाशातुन जमिनीवर त्यांच्या गोलाकार उडत्या विमानात यायचे आणि गावातील एक किंवा दोन व्यक्तींना आपल्यासोबत न्यायचे. त्यांच्यासोबत गेलेले गावातील व्यक्ती नंतर कधीच परतले नाही.

# 10) नानासाहेबांचा खजिन्याचे रहस्य

1857 च्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख योद्धांमध्ये कानपुर येथील नानासाहेबही होते. जेव्हा संग्रामाला सुरुवात झाली तेव्हा नानासाहेब आधी इंग्रजांचा बाजुने होते. त्यांनी इंग्रजांना पुरेपुर सहकार्य करण्याचे वचन दिले होते. कानपुरमधील संग्रामाचा उद्रेकानंतर तेथील कमांडर व्हीलर कानपुरातील सती चौरा घाट येथुन एका बोटीत आपले सैनिक व त्यांच्या परिवारासह तेथुन जीव वाचवुन पळण्याचा प्रयत्नात असताना नानासाहेबांच्या माणसांनी त्यांचावर हल्ला चढविला. ब्रिटीश सैनिक, त्यांच्या स्रिया आणि त्यांच्या मुलांसहीत कमांडर व्हीलरलाही ठार मारण्यात आले. ही घटना इतिहासात 'सती चौरातील कत्तल' म्हणुन प्रसिद्ध आहे. या घटनेनंतर तळमळलेल्या इंग्रजांनी नानासाहेबांचा बदला घेण्यासाठी एखाद्या भुकेल्या कोल्हयांप्रमाणे त्यांचा माग घेण्यास सुरूवात केली. नानासाहेब मात्र वेळीच तेथुन निसटले. तेव्हापासुन ते आजपर्यंत त्यांचा काहीही थांगपत्ता लागलेला नाही. खवळलेल्या ब्रिटींशांनी नानासाहेबांचा खजिना लुटण्याचा बेताने त्यांचा महालावर हल्ला केला. संपुर्ण महाल नासधुस केला पण त्यांना खजिना काही सापडला नाही. पण एका फितुर गुप्तहेराने सांगितल्याप्रमाणे महालातील विहीरींमध्ये त्यांना खजिन्याचे काही अंश सापडले जे जड असल्याने नानासाहेबांनी मुद्दामुनच तेथे सोडले होते. बाकीचा खजिना त्यांनी आपल्यासोबतच नेला होता. नानासाहेब आणि त्यांचा खजिना हा आजपर्यंत एक रहस्याचा विषय आहे. काहीचा मते, नानासाहेबांनी नेपाळला पलायन केले होते, तिथेच कुठेतरी त्यांनी आपला खजिना गाडुन ठेवला असावा ज्याची किंमत आजचा काळात करोडोंचा घरात असावी. नानासाहेबांचा गायब होण्याचा 100 वर्षांनंतर, नेपाळने काठमांडुचा जंगलात एक शोधमोहीम हाती घेतली होती जेथे त्यांना नानासाहेबांचा विधवेने नानासाहेबांचा काही भरवश्याचा लोकांसोबत खजिना गाडला असल्याची शक्यता वाटत होती. खुप प्रयत्न करुनही नेपाळ सरकारला खजिना काही सापडला नाही, पण तो खजिना अजुनही कोठेतरी आपल्या नव्या मालकाची वाट पाहतोय.